**कृषि उन्नती योजना-एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान (MIDH) अंतर्गत राष्ट्रीय फलोत्पादन अभियान योजनेचा प्रथम हप्त्याचा शिल्लक निधी खर्च करणेकरिता आंहरण व संवितरण अधिकारी आणि नियंत्रण अधिकारी घोषित करण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**कृषि,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: राफअ २०२५/प्र.क्र.११८/९-अे**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२
दिनांक: १३ मार्च, २०२६

**संदर्भ :** १) कृषि व पदुम विभाग , शासन निर्णय क्र. राफअ २०२५/ प्र. क्र १७२/ ९-अे दि. ०३.१०.२०२५.
२) संचालक (फलोत्पादन ) , कृषि आयुक्तालय , महाराष्ट्र राज्य , पुणे यांचे जा. क्र/कृआ/फलो /एफविअ/लेखा/३५९ /२०२६ पुणे-५ दि. ०२.०३.२०२६

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ ही संस्था निरसित करून मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या कृषि उन्नती योजना-एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान (MIDH) अंतर्गत राष्ट्रीय फलोत्पादन अभियान योजनेची अंमलबजावणी संचालक (फलोत्पादन) कार्यालयामार्फत राबविण्यास उपरोक्त संदर्भ क्र.१ नुसार मान्यता देण्यात आली आहे. त्यानुषंगाने कृषि उन्नती योजना-एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान (MIDH) अंतर्गत राष्ट्रीय फलोत्पादन अभियान योजनेचा सन २०२५-२६ मधील प्रथम हप्त्याचा शिल्लक निधी कोषागारातून आंहरित करणेकरिता आंहरण व संवितरण अधिकारी आणि नियंत्रण अधिकारी घोषित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय:-**

कृषि उन्नती योजना-एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान (MIDH) अंतर्गत राष्ट्रीय फलोत्पादन अभियान योजनेचा सन २०२५-२६ मधील प्रथम हप्त्याचा शिल्लक निधी कोषागारातून आंहरित करण्याकरिता सहायक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, पुणे यांना आंहरण व संवितरण अधिकारी म्हणून आणि आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०३१३१६१३०९०२०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

LALITKUMAR
RANGNATH
DHAYGUDE

Digitally signed by LALITKUMAR RANGNATH DHAYGUDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Agriculture and Adf Dept,
2.5.4.20=77EE43FEB646B7AE43865425CA1D67A75CD7607FAEAE62A4E9BAD488155D6D28, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=84E88A84C7D5FA8833BA5D3A151CAF394D94599C220A07BDD761A398EED0AC3E, cn=LALITKUMAR RANGNATH DHAYGUDE
Date: 2026.03.13 16:14:55 +05'30'

**( ललितकुमार धायगुडे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रती :-**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई-३२.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२.
३. मा. मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
४. मा. मंत्री (फलोत्पादन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
५. मा. राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
६. मा. विरोधीपक्षनेते, विधानपरिषद, विधानमंडळ, मुंबई.
७. मा. विरोधीपक्षनेते, विधानसभा, विधानमंडळ, मुंबई.
८. मा. विधान परिषद/विधानसभा सदस्य, विधानमंडळ सचिवाल, मुंबई.
९. मा. मुख्य सचिव यांचे स्विय सहाय्यक.
१०. अपर मुख्य सचिव (कृषि), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
११.आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१२.संचालक (फलोत्पादन), कृषि आयुक्तालय , महाराष्ट्र राज्य , पुणे,
१३.महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परीक्षा), मुंबई/नागपुर,
१४.राज्यातील सर्व विभागीय कृषि सह संचालक,
१५.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य
१६.अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
१७.राज्यातील सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,
१८. निवडनस्ती, कार्यासन ९- अे.